



मध्यप्रदेशातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या असीरगड या किल्ल्यावरून नागपूर येथिल राजभवनात ही भव्यदिव्य अष्टधातूंची तोफ आणली असावी अशी नोंद आढळते. तोफेवर पर्शियन भाषेत ‘अबुल मुझफ्फर मोहिउद्दिन मोहम्मद औरंगजेब शाह गाझी’ असे लिहिले असून ती मोहम्मद हुसेन अरब याच्या कारकिर्दीत १६६३ साली बुरहानपूर येथे तयार करण्यात आली असल्याचे नमूद केलेले आहे. तोफेवर असणाऱ्या शिल्पाकृतीतील सिंहाची ही विवर्धित करून दाखविलेली प्रतिमा आहे.

# कलावैभव

नागपूर येथील राज भवनातदेखील सुबक व कलात्मक वस्तूंचा मोठा संग्रह आहे. कोरीव लाकडी फर्निचर, क्रॉकरी, भोसले घराण्यातील राजांची व्यक्तिचित्रे, औरंगजेबाच्या काळातील असीरगड किल्ल्यावरील अष्टधातूंची भव्य तोफ या व इतर वस्तू पाहणाऱ्यास नकळत गतकाळात घेऊन जातात. या प्रकरणामध्ये राज भवनाची वास्तू, शिल्पे व पुरातन वस्तू छायाचित्ररूपाने पाहता येतील.






डावीकडे:
१५ व्या शतकातील जैन तीर्थंकर शिल्प.

उजवीकडे:
उत्खननात सापडलेले ढोलकी वाजवणाऱ्या आदिवासी माणसाचे, अंदाजे १६ व्या किंवा १७ व्या शतकातील पुरातन शिल्प.







डावीकडे:
भारताच्या वैभवशाली संस्कृतीचे स्मरण करून देणारे १६ व्या शतकातील सुबक कोरीव शिल्प. हे शिल्प नागपूरच्या गोंड राजांच्या राजवटीतील असण्याची शक्यता आहे.

उजवीकडे:
जबलपूर येथे उत्खननात सापडलेले महावीरांचे १३ व्या शतकातील शिल्प हे नागपुरातील राजभवनाच्या मुख्य इमारतीमधील मार्गिकेमध्ये ठेवले आहे.






नागपूर हे देशातील सर्वाधिक हिरव्यागार शहरांपेकी एक असल्याचा प्रत्यय राज भवनातून शहरावर दृष्टिक्षेप टाकल्यास येतो. राज भवनाशेजारच्या सेमिनरी हिल येथील वनसंपदेची विविधता थक्क करणारी आहे.



# निसर्गसंपदा

नागपूर येथील राज भवन घनदाट वनराईमध्ये एका पठारावर वसलेले आहे. स्वाभाविकच हे ठिकाण वनराई, फळेफुले व पक्ष्यांनी बहरलेले आहे. सन २०११ साली नागपूर राज भवनातील जवळ जवळ ७० एकर परिसरामध्ये एका भव्य जैवविविधता उद्यानाची निर्मिती करण्यात आली. त्याकरिता प्रथम सुबाभूळसारख्या अनिर्बंध व अस्तव्यस्त वाढलेल्या प्रजाती काढून त्याऐवजी विविध प्रकारच्या शेकडो वृक्ष-वेलींची लागवड करण्यात आली. यामध्ये गुलाबांच्या अनेक प्रजाती, सुगंधी वनस्पती, वनौषधी, निवडुंग, धार्मिक कार्यासाठी पवित्र मानण्यात येणाऱ्या वनस्पतींच्या प्रजाती, अलंकारिक बांबू तसेच मोठ्या प्रमाणात स्थानिक प्रजातींचा समावेश आहे.

नैसर्गिक विविधतेमुळे या परिसराने जणू रंगीबेरंगी वेलबुट्ट्यांचा शालूच पांघरला आहे, असे वाटते. वृक्षवल्लीशिवाय येथे विविध प्रजातींची फुलपाखरे आणि पशुपक्षीदेखील आढळतात. येथे फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी एक ‘फुलपाखरू उद्यान’ तयार करण्यात आले आहे. फुलपाखरांना पोषक असा थंडावा तेथे निर्माण करण्यात आला आहे. अनेक प्रकारच्या पक्ष्यांनी या परिसराला आपले घर बनविले आहे. एका पाहणीनुसार येथे १३९ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. संपूर्ण राज भवन परिसरात जवळ जवळ ५० मोरांचा मुक्त वावर आहे. या प्रकरणात नागपूरच्या राज भवनातील जैवविविधतेचा व त्यातून एकूणच निसर्गाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.



जैव-विविधता उद्यानातील एक निसर्गरम्य पाऊलवाट.





काटेसावर किंवा सिल्क फ्लॉस (सिबा स्पेसिओसा) या झाडाच्या हवेसोबत उडणाऱ्या बिया आपल्या पांढऱ्या शुभ्र केसांमुळे लहान मुलांचे लक्ष वेधून घेतात.





अगदी डावीकडे: जैवविविधता उद्यानातील एका भागात औषधी वनस्पतींकरिता स्वतंत्र मळे केलेले आहेत. याच मळ्यातील ही दातदुखीवर प्रभावी समजली जाणारी अक्कलकाढ्याची फुले (*Spilentes Acmelta*)

डावीकडे: राज भवनाच्या उद्यानात निसर्गाच्या विविध रंगांची उधळण करणारी अनेक फुले पहावयास मिळतात.

उजवीकडे: नागपूर राज भवनातील नव्यानेच निर्माण करण्यात आलेले 'फुलपाखरू उद्यान'.





राज भवनातील ‘फुलपाखरू उद्याना’शेजारी निवडुंगाचे एक छोटे वन तयार करण्यात आले असून सौंदर्यात्मक दृष्टीने त्यामध्ये निरनिराळ्या आकाराच्या निवडुंगांची लागवड करण्यात आली आहे.





फुलपाखरू उद्यानात फुलपाखरांना अनुकूल असे शीतल वातावरण तयार करण्यासाठी छानसे कमळांचे तळे बांधण्यात आले आहे.



राज भवनाच्या निसर्गरम्य परिसरात रुफ्युस ट्रिपीज पक्षी अधूनमधून दृष्टीस पडतात.

© रमेश येवले







अगदी डावीकडे: मेरोपिडी परिवारातील एक कीटकभक्षक पक्षी फुलपाखरावर ताव मारताना

© रमेश येवले

डावीकडे: राज भवनाच्या जैव-विविधता उद्यानात एकाग्रचित्त अवस्थेत बसलेला पांढऱ्या छातीचा किंगफिशर.

© रमेश येवले


PUNYA BHUSHAN
GOVERNOR
OFFICE






# पुणे

मुंबईच्या पावसाळ्यातील दमट हवामानातून सुटका करून घेण्यासाठी, तसेच राजकीय सोयीच्या दृष्टीने गव्हर्नर एल्फिन्स्टन यांनी आपले प्रशासन वर्षातील काही कालावधीकरिता पुणे येथे हलविण्याचे ठरविले. त्यामुळे पुणे येथेदेखील गव्हर्नर यांचेकरिता निवासस्थान बांधण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. सन १८२८ साली गव्हर्नर सर जॉन माल्कम यांनी मेजर फोर्ड सी. बी. यांचेकडून पुण्यातील दापोडी येथे गव्हर्नर निवासस्थानाकरिता एक बंगला विकत घेतला. मात्र आर्थिक व राजकीय अडचणींमुळे ही संपूर्ण मालमत्ता १८६४ साली विकण्यात आली. त्यानंतर जवळ जवळ ७ वर्षांनी एक भव्य 'गव्हर्नमेंट हाऊस' बांधण्याची योजना आखण्यात आली. यासाठी पुण्यातील केन्टॉन्मेन्ट परिसराजवळील गणेशखिंड भागातील एक जागा निश्चित करण्यात आली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गणेशखिंड येथील राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय असलेली ही भव्य वास्तू नव्यानेच सुरू झालेल्या पुणे विद्यापीठाला हस्तांतरित करण्यात आली. याच परिसरात इतरत्र अगोदरपासूनच अस्तित्वात असलेल्या एका वास्तूचे पुनर्निर्माण करून तेथे राज्यपालांचे निवासस्थान हलविण्यात आले. आज या परिसराला 'पुणे राज भवन' म्हणतात. पुणे राज भवन परिसरातील 'पुण्य भूषण' हा बंगला राज्यपालांचे निवासस्थान म्हणून निश्चित करण्यात आला, तर 'पुण्य लक्षण' हा दुसरा बंगला राष्ट्रपतींचा कक्ष म्हणून राखून ठेवण्यात आला. तिसरा महत्त्वाचा बंगला 'पुण्य चिंतन' येथे शासकीय बैठकांसाठी परिषद कक्ष व अतिथीगृहाची सोय करण्यात आली. सन २०१२ साली पुणे राज भवनाच्या दुसऱ्या प्रवेशद्वारालगत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींकरिता एक विश्रामगृह बांधण्यात आले.



'पुण्य चिंतन'च्या पहिल्या मजल्यावर अतिथी कक्षाबाहेरील लाकडी मार्गिका.



## वास्तुविशेष

पुणे राज भवन येथील राज्यपालांचे निवासस्थान असलेला 'पुण्य भूषण' हा बंगला १८८८ साली अतिथीगृह म्हणून बांधण्यात आला होता. कालांतराने या बंगल्यातील अंतर्गत सजावटीमध्ये गरजेनुसार आधुनिक फेरबदल करण्यात आले. या बंगल्यात तीन शयनकक्ष, तीन अभ्यासिका, एक भोजनकक्ष, दिवाणखाना व राज्यपालांचे कार्यालय आहे.

१९०६ साली 'पुण्य भूषण'च्या अगदी समोरच 'पुण्य लक्षण' हा दुसरा बंगला बांधण्यात आला. हा बंगला राज्यपालांच्या सचिवांसाठी बांधण्यात आला होता. कालांतराने या बंगल्याचे नूतनीकरण करण्यात आले व सध्या तो राष्ट्रपती व इतर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींकरिता अतिथीगृह म्हणून राखून ठेवण्यात आला आहे. या बंगल्याच्या मूळ वास्तुच्या रचनेत बदल न करता त्यात नव्या सोयी-सुविधा व फेरबदल करण्यात आले आहेत. ब्रिटिश राजवटीत 'पुण्य चिंतन' ही इमारत राज्यपालांच्या अंगरक्षकांच्या निवासस्थानासाठी राखून ठेवण्यात आली होती. सध्या या इमारतीमध्ये अतिथीकक्ष तसेच परिषदकक्ष आहेत.






डावीकडे:
'पुण्य भूषण' बंगल्यामध्ये असलेले राज्यपालांचे कार्यालय

उजवीकडे:
अध्यक्षीय प्रासाद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पुण्य लक्षण' मधील भव्य ड्रॉईंग रूम.





पुण्य भूषण बंगल्याशेजारी स्वातंत्र्यपूर्व काळातील ही धातूची तोफ ठेवण्यात आली आहे.



# कलावैभव

पुणे राज भवन येथे सिंहली पद्धतीची घंटा, हत्तीचे कोरीव काम असलेली दगडी बैठक, कोरीव काम असलेले फर्निचर, 'क्वीन्स क्राऊन' लोहशिल्प इत्यादी अनेक कलाकुसरींच्या वस्तू आहेत व त्यांची उत्तमप्रकारे जपणूक करण्यात येत आहे.



पुण्य भूषण व
पुण्य लक्षणमधील
मार्गिकेवर स्थित
ही हस्तिशिल्प
असलेली दगडी
बैठक








अगदी
डावीकडे :
पुण्य भूषणच्या
बाहेरील खुल्या
प्रांगणात तीन
पायांच्या स्टॅण्डवर
लटकणारी भव्य
सिंहली घंटा

डावीकडे : ब्रिटिश
कालखंडातील
राणीच्या मुकुटाची
धातूने बनविलेली
शिल्पकृती.



# निसर्गसंपदा

पुण्यातील राज भवनात शिस्तबद्ध रस्ते, लुसलुशीत गवतांचे चौकोनी लॉन्स् व गुलाबांचे बाग काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक पक्षी, फुलपाखरे व कीटक येथे आकर्षित होतात. या प्रकरणात पुणे राज भवनाचे विलोभनीय अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.



पूर्ण बहरात आलेला हा पुण्य भूषण बंगल्याबाहेरील 'रेड पर्ल'.



डावीकडे: पुणे राज भवन येथील उद्यानातील विविध प्रकारचे गुलाब.

उजवीकडे: आतील बाजूस जणू पांढरे शुभ्र दिवे लावल्याचा आभास निर्माण करणारी दुर्मीळ अशी पेंटॅस प्रजातीची फुले पाहताक्षणीच थक्क करतात.

अगदी उजवीकडे: कॉक–कॉम्ब सारखी वन्यफुले काळजीपूर्वक जोपासना केलेल्या राज भवनाच्या उद्यानात हमखास दिसतात.








डावीकडे: राज भवनाच्या पुष्पोद्यानात गुलनार फुलांसह अनेक प्रजातींची फुले पहावयास मिळतात.

उजवीकडे: पुण्य लक्षणच्या बाहेर असलेल्या सदाबहार चिनी वनस्पती आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पानांमुळे लक्ष वेधून घेतात.









# महाबळेश्वर


निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेले, थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर येथेदेखील राज्यपालांकरिता एक कायमस्वरूपी उन्हाळी निवासस्थान आहे. पूर्वी 'द टेरेसेस्' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बंगल्याचे कालांतराने 'गिरी दर्शन' असे नामकरण झाले. दाट वनराईमध्ये हे निवासस्थान वसलेले आहे व तेथून सह्याद्रीच्या पर्वतरांगांचे मनोहारी दर्शन होते. 'द टेरेसेस्' हा बंगला सन १८८४ साली विकत घेण्यात आला. राज्यपालांचे निवासस्थान असलेली मालमत्ता प्रामुख्याने दोन भागांत विभागली आहे. त्यांपैकी 'गिरी दर्शन' हे राज्यपालांचे निवासस्थान आहे तर 'गिरी लक्षण' येथे राज्यपालांच्या पाहुण्यांची निवासव्यवस्था असते. गजबजलेल्या शहरापासून दूर असा हा रमणीय परिसर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांसाठी नेहमीच मोठ्या आकर्षणाचा विषय होता. त्यामुळे सन १८२६ साली नवीन शासकीय निवासस्थानासाठी संभाव्य ठिकाण म्हणून गव्हर्नर माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांचे महाबळेश्वरकडे लक्ष गेले.

मात्र मुंबई–महाबळेश्वर हे अंतर व इतर काही कारणांमुळे महाबळेश्वर येथील शासकीय निवासस्थान प्रामुख्याने गव्हर्नरचे केवळ उन्हाळी निवासस्थान म्हणून वापरले जाऊ लागले व आजही ते उन्हाळी निवासस्थान म्हणूनच वापरले जाते. साधारणपणे मे महिन्यात राज्यपाल काही दिवसांकरिता महाबळेश्वर येथे मुक्कामाला असतात व त्या कालावधीत ते आसपासच्या परिसरातील विकास योजनांच्या कामांची पाहणी करतात व प्रकल्पांना भेटी देतात.

# वास्तुविशेष

निसर्ग सौंदर्याने नटलेले महाबळेश्वर हे मुंबईच्या गव्हर्नरचे आवडते उन्हाळी निवासस्थान होते. वेगवेगळ्या कालावधीत येथील वेगवेगळ्या इमारतींमध्ये गव्हर्नरांचे वास्तव्य राहिले आहे. यांपैकी पूर्वी 'बेला व्हिस्टा' नावाने ओळखले जाणारे निवासस्थान मुंबईच्या गव्हर्नरचे १८७८ साली विकत घेतलेले पहिले निवासस्थान होते. आज राज्यपालांच्या निवासासाठी राखून ठेवण्यात आलेल्या 'गिरी दर्शन' व 'गिरी लक्षण' या दोन्ही इमारती आपल्या गतवैभवाची साक्ष देतात. या इमारतींच्या आसपास कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, गॅरेज इत्यादी सुविधा आहेत.





राज्यपालांच्या उन्हाळी निवासस्थानांपैकी एका बंगल्याच्या बाल्कनीमधून दिसणारा सभोवतालचा हिरवागार परिसर.




डावीकडे:
महाबळेश्वर येथे पर्वत रांगांच्या कुशीत असलेला 'गिरी लक्षण' हा बंगला राज्यपालांच्या अतिथींच्या निवासासाठी वापरला जातो.

उजवीकडे:
बंगल्यातून बाहेर जाणारी दगडी मार्गिका. मार्गिकेच्या कमानीमुळे बाहेरचा परिसर अधिकच सुंदर दिसतो.

अगदी उजवीकडे:
महाबळेश्वर येथील राज्यपालांच्या उन्हाळी निवासस्थानातील दरबार हॉल एका स्वतंत्र इमारतीमध्ये आहे. या हॉलकडे जाणारी पायऱ्या असलेली ही टुमदार पाऊलवाट.










महाबळेश्वरमधील राज्यपालांच्या उन्हाळी बंगल्याचा परिसर वनसंपदा आणि जीवसृष्टीच्या वैविध्याने नटलेला आहे.




# निसर्गसंपदा

सदाहरित वनसंपदेपैकी एक असलेल्या महाबळेश्वरचा परिसर विविध प्रकारच्या जैवविविधतेने नटलेला आहे. राज्यपालांच्या निवासस्थानाच्या आसपास विविध प्रकारच्या वनस्पती, वनौषधी, फळफळावळ व भाजीपाल्याचे मळे आहेत. येथील वनस्पती आणि प्राणीजीवन हे निसर्गाचे अद्भुत आविष्कार आहेत. ह्या प्रदेशातील वन्यजीवनाची विविधतासुद्धा स्तिमित करणारी आहे. स्ट्रॉबेरी, रास्पबेरी, लाल बटाटे, फ्रेंच बीन्स, गाजर आणि फळे-भाज्यांच्या कित्येक प्रजातींनी आजूबाजूचा हिरवागार परिसर संपन्न आहे. या प्रकरणामध्ये महाबळेश्वर येथील निसर्ग संपदा व जैवविविधतेचे अंतरंग उलगडून दाखविले आहे.



राज्यपालांच्या बंगल्याजवळील ही नैसर्गिक पाऊलवाट.





वनराईमुळे बंगला सुंदर दिसतो की बंगल्यामुळे वनराई, असा प्रश्न येथे येणाऱ्यांना पडल्याशिवाय राहत नाही.






मुंबई येथील राज भवनाच्या पश्चिमेकडील बाजूला देवीचे एक जुने मंदिर आहे. पूर्वी कोळी लोक आषाढ महिन्यातील एका मंगळवारी देवीच्या दर्शनासाठी येथे सजवलेल्या बोटीतून येत असत. अनेकांचे श्रद्धास्थान असलेली ही देवी श्रीगुंडी, सागरमाता, साकळाई ह्या व इतर नावांनी ओळखली जाते.



# राजभवनांचा पूर्वेतिहास

महाराष्ट्रातील राजभवनांमध्ये सर्वसामान्यांना ज्ञात नसलेल्या परंतु कुतूहल जागविणाऱ्या अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी आहेत. या प्रकरणात राज्यपाल व राज भवनांसंबंधी सर्वसाधारण लोकांना माहिती नसलेल्या गोष्टी तसेच जुन्या काळातील ‘गव्हर्नमेंट हाउस’ राहिलेल्या वास्तूंवर प्रकाश टाकला आहे.



‘बॉम्बे कॅसल’ मधील हे आहे पोर्तुगीजद्वार. कॅसलमधील ‘मनोर हाऊस’ हे ब्रिटिशांचे मुंबईतील पहिले ‘गव्हर्नमेंट हाऊस’ होते. मनोर हाऊसला खऱ्या अर्थाने ‘पहिले राज भवन’ म्हणता येईल. आज मनोर हाऊसचे केवळ प्रवेशद्वार व आतील बाजूस असलेले दगडी सनडायल (सूर्यघड्याळ) गतकाळच्या स्मृतिरूपाने शिल्लक आहेत. हे पोर्तुगीजद्वार फोर्ट येथील भारतीय नौदलाच्या आयएनएस आंग्रे या संरक्षित परिसरात आहे.





आज ‘हाफकिन इन्स्टिटयूट’ या शासकीय संस्थेचे कार्यालय असलेली ही इमारत पूर्वी ‘परळ हाऊस’ या नावाने प्रसिद्ध होती. सन १८८५ पर्यंत ‘गव्हर्नमेंट हाऊस’ या वास्तूमध्ये होते. तेथून ते मलबार हिल येथे सध्याच्या ठिकाणी कायमचे हलविण्यात आले.






मलबार हिल येथील राज भवनात ब्रिटिश गर्व्हनर्स व राज्यपाल ह्यांच्याकडील पाळीव प्राण्यांच्या समाधी आहेत. आपल्या लाडक्या प्राण्यांच्या आठवणींप्रित्यर्थ लावलेली ही स्मृतिशिल्पे मनुष्य व पाळीव प्राणी यांच्यामधील उत्कट भावबंधाचे स्मरण देतात.






नागपूर येथे नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या जैवविविधता उद्यानाची माहिती विद्यार्थी व अतिथींना देण्याकरिता येथे पूर्वीपासूनच असलेल्या एका जुन्या आऊट हाऊसमध्ये ‘निसर्ग माहिती केंद्र’ सुरू करण्यात आले आहे.






पुण्यातील खडकी भागातील १७५ वर्षे जुन्या ऑल सेन्टस् चर्च येथे, आजही प्रार्थनेसाठी बसण्याच्या मेजवर ‘गव्हर्नरसाठी राखीव’ असे निर्देशित करणारा पितळी फलक आढळतो.






पुण्यातील गणेशखिंड येथील जुने ‘गव्हर्नमेंट हाऊस’ स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश गव्हर्नरचे निवासस्थान होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते पुणे विद्यापीठाला हस्तांतरित करण्यात आले.



# राजशिष्टाचार व महत्त्वाच्या घडामोडी

राज्यपालांच्या संदर्भात संकेतानुसार राजशिष्टाचाराच्या काही प्रथा पाळल्या जातात. दरवर्षी राज्यपाल २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजी गणमान्य नागरिकांसाठी चहापानाचे आयोजन करीत असतात. राज्यपाल जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना तेथे त्यांना जिल्हा पोलिसांतर्फे आगमनानंतर तसेच प्रस्थानाच्या वेळी मानवंदना देण्यात येते. राजशिष्टचाराच्या प्रथा व राज्यपालांसंबंधी कार्यक्रमांचा या प्रकरणात समावेश केला आहे.




दिनांक ३० एप्रिल १९६० च्या मध्यरात्री १२ वाजता भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र राज्याचे राज भवन येथे समारंभपूर्वक उद्घाटन केले. त्याप्रसंगी घेतलेल्या छायाचित्रात राज्यपाल श्रीप्रकाश (डावीकडे) व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण (उजवीकडे) हे देखील दिसत आहेत.

© माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य





वर: मुंबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या एकदिवसीय स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विजय प्राप्त करून विश्वचषक जिंकल्याबद्दल तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या सन्मानार्थ दि. ३ एप्रिल २०११ रोजी राज भवन, मुंबई येथे चहापानाचे आयोजन केले होते. त्या वेळी घेतलेल्या छायाचित्रात डावीकडून मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, राज्यपाल के. शंकरनारायणन्, केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचेसह विजयी चमू दिसत आहे.

© अरुण कुलकर्णी

उजवीकडे: राज भवन मुख्यालयात राज्यपालांचा मुक्काम असताना दररोज सूर्योदयाला राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो व सूर्यास्ताला बिगुलाच्या घोषात तो सन्मानपूर्वक उतरविण्यात येतो.



डावीकडे: प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी प्रथेनुसार राज भवन येथील हिरवळीवर निमंत्रित मान्यवरांकरिता चहापान आयोजित केले जाते. अशाच एका ‘अॅट होम रिसेप्शन’साठी हिरवळीवर येत असताना राज्यपाल के. शंकरनारायणन्, राधा शंकरनारायणन् आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण (अगदी डावीकडे).

खाली: मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण (डावीकडून तिसरे) राज भवन येथील चहापानाच्या वेळी निमंत्रितांशी संवाद साधताना.








वर व बाजूला: नागपुरातील राज भवनात आगमन झाल्यानंतर पोलीस दलाकडून मानवंदना स्वीकारताना राज्यपाल के. शंकरनारायणन्. राजशिष्टाचाराच्या प्रथेनुसार राज्यपाल जिल्हा मुख्यालयात आल्यावर तसेच मुख्यालय सोडताना त्यांना मानवंदना देण्यात येते. मानवंदनेच्या वेळी राष्ट्रगीत गायले जाते किंवा पोलीस बॅन्डवर वाजविण्यात येते.





डावीकडे: दिनांक ६ जानेवारी १९४८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. एम्. सी. छागला यांचेकडून शपथ घेताना मुंबई राज्याचे पहिले भारतीय राज्यपाल राजा महाराज सिंग. डावीकडे मुंबई राज्याचे पंतप्रधान बी. जी. खेर.


© टाईम्स ऑफ इंडिया, बेनेट कोलमन आणि कंपनी लि. सर्व हक्क सुरक्षित.


खाली: १ मे १९६० रोजी मुंबईतील सचिवालय येथे राज्यपाल श्रीप्रकाश यांचेकडून पदाची शपथ घेताना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण.

© माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य.



## राज्यपालांची सूची


राजा महाराज सिंग
(६ जाने. १९४८–२९ मे १९५२)


श्री. गिरीजा शंकर वाजपेयी
(३० मे १९५२–५ डिसे. १९५४)


डॉ. हरेकृष्ण मेहताब
(२ मार्च १९५५–१४ ऑक्टो. १९५६)


श्री. श्रीप्रकाश
(१० डिसें. १९५६–१६ एप्रिल १९६२)



डॉ. पी. सुब्बरायण्
(१७ एप्रिल १९६२–६ ऑक्टो. १९६२)


श्रीमती विजयालक्ष्मी पंडित
(२८ नोव्हें. १९६२–१८ ऑक्टो. १९६४)


डॉ. पी. व्ही. चेरीयन्
(१४ नोव्हें. १९६४– ८ नोव्हें. १९६९)


नवाब अली यावर जंग
(२६ फेब्रु. १९७०–११ डिसें. १९७६)


श्री. सादिक अली
(३० एप्रिल १९७७–२ नोव्हें. १९८०)


एअर चीफ मार्शल ओ. पी. मेहरा
(निवृत्त)
(३ नोव्हें. १९८०– ५ मार्च १९८२)




एअर चीफ मार्शल आय्. एच्. लतीफ
(निवृत्त)
(६ मार्च १९८२–१६ एप्रिल १९८५)


श्री. कोना प्रभाकर राव
(३० मे १९८५–२ एप्रिल १९८६)


डॉ. शंकर दयाल शर्मा
(३ एप्रिल १९८६–२ सप्टें. १९८७)


श्री. के. ब्रह्मानंद रेड्डी
(२० फेब्रु. १९८८–१८ जाने. १९९०)



श्री. सी. सुब्रमण्यम्
(१५ फ्रेबु. १९९०–९ जाने. १९९३)


डॉ. पी. सी. अलेक्झांडर
(१२ जाने. १९९३–१३ जुलै २००२)


श्री. मोहम्मद फजल
(१० ऑक्टो. २००२–५ डिसें. २००४)


श्री. एस्. एम्. कृष्णा
(६ डिसें. २००४–८ मार्च २००८)


श्री. एस्. सी. जमीर
(१९ जुलै २००८–२१ जाने २०१०)


श्री. के. शंकरनारायणन्
(२२ जाने, २०१०–)